महानगरपालिका सचिवालय

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महानगरपालिका महासभा ठराव

**सभा क्र. :** ०३

**विषय क्र. :** ९९८ **ठराव क्र. :** ९९८ **दिनांक :** १२/०६/२०२५

संदर्भ-मा.आयुक्त तथा प्रशासक सो.यांचेकडील जा.क्र/ मलनि:/३२८/२०२५ दि.१२.०६.२५ चे पत्र.

१. M/s. Almondz Global Securities Limited यांना देण्यात आलेला कार्यादेश NMC/ PHED / SEW/ १८/२०२३ दि.०६/०२/२०२३.

२. NRCD,नवीदिल्ली यांना दिलेले पत्र जाक्र. मनपा/साआअवि/मलनि:/५३०/२०२४ दि१२/१२/२०२४

३. M/s. Blue Stream Infrastructure Development Consultant Pvt. Ltd. यांना देण्यात आलेला कार्यादेश जा.क्र. मनपा/साआअवि/मलनि:/१०/२०२५ दि. ३१/०१/२०२५

४. या कार्यालयाचे NRCD यांना दिलेले पत्र NMC/PHED/SEW/१२१/२०२५ दि.२४/०२/२०२५

५. मा. महासभा ठराव क्र. ६६४ दि. ११/०२/२०२५.

६. मा. महासभा ठराव क्र. ६६९ दि. ११/०२/२०२५. (PPP-HAM)

७. मा.शासनास सादर करण्यात आलेले पत्र जा.क्र. मनपा/ साआअवि /मलनि:/ ८९/२०२५ दि.१४/०२/२०२५.

८. मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांना दिलेले पत्र जा.क्र.मनपा/ साआअवि/ मलनि:/९१/२०२५ दि. १४/०२/२०२५.

९. मा. महासभा ठराव क्र. ७०८ दि. १३/०३/२०२५.

१०. मा. महासभा ठराव क्र. ०३ दि. ०४/०४/२०२५.

११. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि. १७/०१/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त - दि.२४/०२/२०२५.

१२. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि.२६/०२/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त - दि. २७/०३/२०२५.

१३. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि. २३/०३/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त – दि. ०८/०४/२०२५.

१४. M/s E & Y यांना देण्यात आलेले इकडील विभागाचे पत्र जा.क्र.मनपा/साआअवि/ मलनि:/ २०७/२०२५ दि. ०७/०४/२०२५.

१५. सल्लागार M/s. Blue Stream Infrastructure Development Consultant Pvt. Ltd. यांनी सादर केलेले Optimized DPR बाबतचे पत्र दि. २४/०४/२०२५.

१६. The Director, VNIT यांना देण्यात आलेले इकडील विभागाचे पत्र .क्र.मनपा/साआअवि/ मलनि:/२४६ अ/२०२५ दि. २५/०४/२०२५.

१७. मा. शासन निर्णय ई. एन. व्ही. २०२५/ प्र क्र ३२(२)/तां क. ३ दि. ३०/०४/२०२५.

१८. मा. महासभा ठराव क्र. ५८ दि. ०७/०५/२०२५.

१९. नाशिक महानगरपालिकेने मा.शासनाला दिलेले पत्र जा.क्र.मनपा /साआअवि(मलनि:)/२७६/ २०२५ दि.०९/०५/२०२५.

२०. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे पत्र क्र. अमृत-२०२५/ प्र.क्र.१७९/ नवि-३३ दि. २९/०५/२०२५.

२१. मा.शासनाकडील शासन निर्णय क्र.नामपा-२०२५ प्र.क्र.१६१/नवि-२५ दि.०९/०६/२०२५.

२२. मा. मुख्य अभियंता,मजीप्रा,नाशिक प्रादेशिक विभाग,यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र.मुअ/ नाशिक / उपअभियंता-०२/१८७५/२०२५ दि.०९/०६/२०२५.

२३. मा. मुख्य अभियंता,मजीप्रा,नाशिक प्रादेशिक विभाग, यांना जा.क्र.मनपा/साआअवि (मलनि:) /३२४/२०२५ दि. १०/०६/२०२५ अन्वये दिलेले पत्र.

२४. M/s. Blue Stream Infrastructure Development Consultant Pvt. Ltd. यांना दिलेले पत्र क्र. जा.क्र./मनपा/साआअवि(मलनि:) ३२२/२०२५ दि. १०/०६/२०२५.

२५. मा. मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांचे कडील पत्र जाक्र. मुअ/नाशिक/ चिशा/१९१९/२०२५ दि.११/०६/२०२५.

२६. M/s. Vishvaraj Enviroment Pvt. Ltd. Mumbai यांना दिलेले पत्र जा.क्र./मनपा/ साआअवि (मलनि:)/३२६/२०२५ दि. ११/०६/२०२५.

महानगरपालिका सचिवालय

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महानगरपालिका महासभा ठराव

सभा क्र. : ०३

विषय क्र. : ११८ ठराव क्र. : ११८ दिनांक : १२ /०६ /२०२५

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,**

नाशिक मनपा क्षेत्रासाठी मलजल व्यवस्थापनाकरीता सर्वकक्ष असा मलनिःसारण व्यवस्थापन आराखडा तयार करणेत आला आहे. सदर आराखड्यात संकल्पित केल्यानुसार भौगोलिक संरचनेच्या दृष्टीकोनातून नाशिक मनपा क्षेत्र आठ सिव्हरेज झोन मध्ये विभागण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक Sewerage Zone मध्ये रहीवाशी भागातील तयार होणारे सांडपाणी वाहुन नेणेसाठी सुमारे १९८९ कि.मी. लांबीच्या मलवाहिका टाकण्यात आल्या असुन त्यावर प्रक्रिया करणेसाठी १८ पंपिंग स्टेशन द्वारे तपोवन, आगरटाकळी, चेहेडी, पंचक, गंगापुर व पिंपळगाव खांब या ६ ठिकाणी एकुण ११ मलनि:सारण केंद्रांमध्ये वाहुन नेण्यात येऊन त्यावर प्रक्रिया केली जात आहे मलजलप्रक्रिया केंद्रांची एकुण स्थापित क्षमता ३९२.५० एम.एल.डी. आहे.

<u>राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय, नवी दिल्ली (NRCD) On EPC Mode:</u>

नाशिक तीर्थक्षेत्र येथे दर बारा वर्षानी सिंहस्थ कुंभमेळा आयोजित करण्यात येतो. आगामी सन २०२७-२८ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित करण्यात येणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्या करिता देश व विदेशातून भाविक पवित्र गोदावरी नदीत स्नान करण्यासाठी येत असतात. त्यामुळे गोदावरी नदीचे पावित्र्य राखणे व गोदावरी प्रदूषण मुक्त ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. उपरोक्त मलनिःसारण कामांचे प्रकल्प राबविण्याकरिता निधीची आवश्यकता आहे. त्या करिता मनपाकडील सल्लागार M/s. Almondz Global Securities Ltd. in consortium with Nangia & Co. LLP & AMs Project Consultant यांचे मार्फत STP प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेले आहेत. सदर प्रस्ताव संदर्भ क्र. ०२ जा.क्र.मनपा/ साआअवि/मलनि:/५३०/२०२४ दि.१२/१२/२०२४ अन्वये NRCD, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पास NRCD यांचेमार्फत निधी उपलब्ध झाल्यास सदरचे काम EPC निविदा पद्धतीद्वारे सत्वर हाती घेता येणेकरिता संदर्भ क्र. ०५ मा. महासभा ठराव क्रमांक ६६४ दि. ११/०२/२०२५ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात येऊन प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. NRCD यांचे दि.०३/०२/२०२५ रोजीचे पत्राबाबत संदर्भ क्र. ०७ मा.शासनास पत्र जा.क्र.मनपा/ साआअवि/मलनि:/८९/२०२५ दि.१४/०२/२०२५ अन्वये मा. राज्य शासनाचा ४०% हिस्सा मिळण्यासाठी विनंती करण्यात आली होती. NRCD यांचेकडेस वेळोवेळी प्रकल्प अहवाल सादर करण्यात येऊन प्रस्ताव मंजुरी करीता पाठपुरावा करण्यात आलेला आहे. तथापी अद्याप पावतो NRCD यांचे मार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना मान्यता अप्राप्य आहे.

<u>सार्वजनिक / खाजगी भागीदारी (PPP-HAM) तत्वावर प्रकल्प राबविणे.</u>

मा. मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सन २०२७ मध्ये सिंहस्थकुंभ मेळ्याच्या अनुषंगाने दि. १७/०१/२०२५ रोजी संदर्भ क्र. ११ नुसार झालेल्या बैठकीतील इतिवृत्तामधील मुद्दा क्र. ०४ नुसार "सिवेज ट्रीटमेंट प्लांट (सांडपाणी व्यवस्थापन संयंत्र) चे नागपूर व इतर शहरांमध्ये बांधकाम करताना कोणत्या वित्तीय मॉडेलचा वापर करण्यात आला किंवा अहमदाबाद येथे रिंग रोड बांधकाम करताना वापरण्यात आलेले वित्तीय मॉडेल अशा वेगवेगळ्या वित्तीय मॉडेलचा विचार करण्यात यावा. याशिवाय CSR(Corportate Social Responsibility) याचाही योग्य तो वापर कामासाठी करावा." असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

PPP-HAM या पदधतीने निविदा प्रक्रिया राबविण्याचे फायदे:- जोखीम वाटपाची संतुलित रचना, प्रकल्प उभारणीकरीता मा. महाराष्ट्र शासनामार्फत अनुदान प्राप्त होणार असल्याने नाशिक महानगरपालिकेवरील प्रकल्प उभारणीचा आर्थिक भार कमी होणार आहे, कामगिरीवर व Key Performance Indicator (KPI) आधारित पेमेंट, दीर्घकालीन देखभाल व शाश्वतता, वेळेत प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता अधिक, उत्तरदायित्व व पारदर्शकता वाढते.

उपरोक्त प्राप्त निर्देश व फायदयानुसार PPP-HAM तत्वावर प्रकल्प राबविणेसाठी आर्थिक सल्लागार म्हणुन M/s Bluestream Infrastructure Development Private Limited यांची नेमणुक ई-कोटेशन पध्दतीने करण्यात आली. EPC Model कामाचे यापुर्वी नियुक्त सल्लागार M/s. Almondz Global Securities Ltd. in consortium with Nangia & Co. LLP & AMs Project Consultant यांनी तयार केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल हे PPP-HAM सल्लागार यांना पुढील कार्यवाही करीता पुरविण्यात आलेले आहे. त्यानुसार PPP-HAM Model नुसार अभ्यास करुन सल्लागार M/s. Bluestream Infrastructure Development Private Limited यांनी सुधारीत प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे.

उपरोक्त विषयाधिन कामाचे सुरवातीला, सल्लागार M/s.Bluestream Infrastructure Development Private Limited यांनी र.रु.१३२५ कोटी (Capex) इतक्या रकमेचा प्रस्ताव देण्यात आला आहे. संदर्भ क्र. ०६ मा. महासभा ठराव क्र.६६९ दि.११/०२/२०२५ नुसार प्रशासकिय मंजुरी घेण्यात येऊन कामाचे RFQ ची निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. मा. शासनाला याबाबत संदर्भ क्र. ०८ पत्र जा.क्र./मनपा/ साआअवि/ मलनि:/९१/ २०२५ दि.१४/०२/२०२५ नुसार कळविण्यात आले आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षते खाली संदर्भ क्र. १२ दि.२६/०२/२०२५ रोजी सिंहस्थ कुंभमेळा-२०२७ तयारीच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत मुद्दा क्र.१३ नुसार, "नाशिक शहरातील मलजल / सांडपाणी शुदधीकरण यंत्रणेसाठी निविदा RFQ प्रसिद्ध झाली आहे. शासनाकडुन या प्रकल्पासाठी योग्य त्या शिर्षामधुन / योजना मधुन निधी उपलब्ध करुन द्यावा. त्याचप्रमाणे नाशिक मधील औद्योगिक वसाहती मधील सांडपाणी व्यवस्थापन आणि त्यावरील प्रक्रिया या बाबत आवश्यक ती यंत्रणा उभारावी." असे निर्देश. मा: प्रधान सचिव, नगर विकास विभाग,(नवि-२) मा. सचिव, उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन देण्यात आलेले आहेत.

EPC Model करिता तयार करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालाचा अभ्यास करण्यात येऊन त्यामध्ये असणारी पोकळी भरुन काढण्या करिता सल्लागार यांनी फेर सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार यापुर्वी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात आवश्यकेतेनुसार सुधारणा करण्यात आली.त्याचप्रमाणे गोदावरी नदीमध्ये प्रवाहित असणारे सांडपाण्याचे नाले, चांदसी व जलालपुर भागातील सांडपाण्याचा विचार करुन गोदावरी नदी व नाल्यांचे सर्वेक्षण करुन सर्वसमावेशक प्रस्ताव र.रु. १६३६ कोटी (Capex) इतक्या रक्कमेचा सुधारीत प्रस्ताव सादर केला (Block Estimate) सदर प्रस्तावास संदर्भ क्र. ०९ मा. महासभा ठराव क्र. ७०८ दि.१३/०३/२०२५ नुसार प्रशासकिय मंजुरी घेण्यात आली आहे.

**निविदा प्रक्रीया :-**

सदर कामाची RFQ ची जाहीर ई-निविदेचा ऑनलाईन कालावधी दि. २४/०२/२०२५ ते दि.१०/०३/२०२५ पर्यत देण्यात आला होता. विहित निविदा कालावधी मध्ये कामांसाठी तीन निविदा- धारकांनी सहभाग घेतला आहे.संबंधीत निविदाधारकांची कागदपत्रांची तपासणी केली असता तीन ही निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्या आहेत.

सदर निविदेतील दुसरा टप्पा RFP ची प्रक्रिया राबविण्यासाठी संदर्भ क्र. १० मा.महासभा ठराव क्र.०३ दि.०४/०४/२०२५ नुसार मंजुरी घेण्यात आलेली आहे.निविदेसाठी पात्र ठरलेल्या निविदाधारकांकरिता RFP ची प्रक्रिया राबविण्यासाठी दि.०५/०४/२०२५ ते दि.१९/०४/२०२५ पर्यत ऑनलाईन कालावधी देण्यात आला होता.

सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडणत येऊन तीनही निविदाधारक तांत्रिक दृष्टया पात्र होत आहेत. तांत्रिक पात्रतेबाबतचा अहवाल ऑनलाईन अपलोड करण्यात येऊन दि.०७/०५/२०२५ रोजी आर्थिक देकार उघडण्यात येऊन आर्थिक विवरणपत्र डाऊनलोड करण्यात आले आहे.

सिंहस्थ कुंभमेळाकरिता सुमारे दोन वर्षाचा शिल्लक कालावधी विचारात घेता उपरोक्त प्रकल्प तातडीने हाती घेणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. सदरचे प्रकल्प आगामी काळातील सिंहस्थ कुंभमेळा २०२७-२०२८ करिता तातडीने हाती घेणे आवश्यक असल्याने सदर कामासाठी मा. राज्य शासनाने PPP- HAM अंतर्गत प्रकल्प हाती घेणे करिता मनपास निधी उपलब्ध करून देणेबाबत आश्वासित केलेले आहे. यास्तव संदर्भ क्र. ०६ मा महासभा ठराव क्रमांक ६६९ दि. ११/०२/२०२५ अन्वये कार्यवाही करणे शक्य होत आहे. याप्रमाणे संदर्भ क्र. १८ मा. महासभा ठराव क्र ५८ दि. ०७/०५/२०२५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र. ०८ मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांना जा.क्र.मनपा/साआअवि/मलनि/९१/२०२५ दि.१४/०२/२०२५ चे पत्रानुसार सदर प्रकल्प PPP-HAM तत्वावर राबविणेसाठी मान्यता मिळणेबाबत पत्र दिलेले आहे.

संदर्भ क्र. १३ नुसार मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य,यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि.२३/०३/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तातील मद्दा क्र. ०१ नुसार "नाशिक मनपा हद्दीत PPP-HAM पध्दतीवर राबविण्यात येणारा मलनि:स्सारण प्रकल्प हा सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या दृष्टीने महत्वाचा असल्याने तो दोन वर्षात पुर्ण करणे आवश्यक आहे. सबब सदर प्रकल्पासाठी प्रसिध्द करावयाच्या निविदा सुचनेची सर्व प्रक्रीया ही दोन आठवडयात पुर्ण करण्यात यावी आणि एप्रिल २०२५ मध्ये सदर प्रकल्पाचे काम सुरु करावे." असे निर्देश दिलेले आहेत.

सद्य:स्थितीत नाशिक महानगरपालिकेने मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य,यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि.१७/०१/२०२५, दि.२६/०२/२०२५ व दि.२३/०३/२०२५ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार PPP-HAM तत्वावर सदर प्रकल्प राबविणेसाठीची निविदा प्रक्रीया पुर्ण केलेली आहे. सदर प्रस्तावाबाबत संदर्भ क्र. १० मा. महासभा ठराव क्र.०३ दि.०४/०४/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आल्यानुसार सदर प्रकल्पाचे PPP-HAM तत्वावर राबविण्याकरीता सल्लागार यांनी सादर केलेले Financial Model ची तपासणी इतर अनुभवी सल्लागारामार्फत तपासणी करण्याकरीता संदर्भ क्र. १४ नुसार M/s E & Y यांना पत्र जा.क्र.मनपा/साआअवि/ मलनि/२०७/२०२५ दि. ०७/०४/२०२५ देवुन अहवाल मागविण्यात आला. M/s. E & Y यांनी ई-मेलव्दारे पाठविलेला अहवाल इकडील कार्यालयास दि. २९/०४/२०२५ प्राप्त झालेला आहे. सदर ई-मेलमधील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत "सादर करण्यात आलेल्या आर्थिक नमुन्याची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये कोणतीही तफावत आढळून आलेली नाही. हा

नमुना PPP-HAM प्रकल्पांच्या तत्त्वांनुसार तयार करण्यात आलेला असून, प्रारंभिक बांधकाम सहाय्य व वार्षिक हप्त्यांची गणना योग्य आहे".

सल्लागार M/s. Blue Stream Infrastructure Development Consultant Pvt. Ltd. यांनी संदर्भ क्र. १५ नुसार दि. २४/०४/२०२५ रोजी सदर कामाचा Optimized DPR र.रु. १५९९ कोटी (Capex) सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रकल्प अहवालाचे तांत्रिक Vetting करणेबाबत संदर्भ क्र. १६ नुसार The Director, VNIT, Nagpur यांना पत्र देण्यात आले असता त्यानुसार The Director, VNIT, Nagpur यांनी Vetting बाबतचा अहवाल या विभागाकडे दि. ०२/०५/२०२५ रोजी सादर केलेला आहे. त्याचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे. "PPP-HAM मॉडेलमधील डीपीआर सर्वसमावेशक असून, पुढील २५ वर्षांसाठी § तीन कुंभ मेळ्यांचा समावेश करून § गोदावरी नदी प्रदूषणमुक्त ठेवण्याच्या मनपा (NMC) च्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे. विद्यमान सुविधांना कोणताही अडथळा न आणता काम करण्याची अंमलबजावणी पद्धत प्रकल्पाच्या वेळेच्या मर्यादेनुसार योग्य आहे. रचना व अंमलबजावणीतील गुंतागुंतीचा विचार करता अंदाजित खर्च वाजवी आहे. त्यामुळे मनपाने या डीपीआरचा विचार करून आवश्यक आर्थिक तरतूद करावी."

सदर निविदेतील कंत्राटदारांनी सादर केलेले आर्थिक देकाराची छाननी करता Financial Bid Evaluation Report नुसार सदरचे कामात प्राप्त कमीत कमी दराची M/s. Vishwaraj Environment Pvt. Ltd. यांचे निविदा दर हे प्राकलन दराशी तुलना केली असता ते ९.२२% कमी दराचे असल्याचे सल्लागार M/s Bluestream Infrastructure Development Private Limited यांनी त्यांचे दि. ०८/०५/२०२५ रोजीचे अहवालात नमुद केले आहे.

सद्य:स्थितीत प्राप्त असलेले कंत्राटदाराचे दरानुसार कामासाठी आवश्यक असलेल्या शासन निधीचे विवरण खालीलप्रमाणे दिले आहे.

| Sr. No. | Items | Option "A" ७०% Govt. Funding | Option "B" ६०% Govt. Funding |
|---|---|---|---|
| १ | Project Cost Rs. १४८२.९५ Cr. as per quoted rate L१ including GST (१८%) | Rs. १,०३८.०७ Cr. | Rs. ८८९.७७ Cr. |

प्राप्त् निविदा दरानुसार भांडवली व महसुली खर्चाचे विवरण खालील प्रमाणे आहे त्यानुसार प्रकल्पाची एकुण किमत, भाववाढ फरक विचारात न घेता र.रु. २,६३२.९५ कोटी इतकी येत आहे.

| Sr. No. | Items | Amount Rs. In Cr. |
|---|---|---|
| १ | Total Capital Cost Including GST (१८%) (Excluding Price Escalation) | १,४८२.९५ |
| २ | O & M for २५ years Including GST (१८%) (Excluding Price Escalation) | १,१५०.०० |
| ३ | Total Project Cost (३ + ४) (Excluding Price Escalation) | २,६३२.९५ |

**<u>सविस्तर प्रस्ताव शासनाकडे सादर :-</u>**

तरी वरील सर्व बाबींचा विचार करुन सदर PPP-HAM तत्वावर प्रकल्प राबविणेकरीता नाशिक महानगरपालिकेने संदर्भ क्र. १९ जा.क्र.मनपा/साआअवि(मलनिः)/२७६/२०२५ दि.०९/०५/२०२५ रोजीच्या पत्रानुसार वस्तूनिष्ठ अहवाल पूरक संदर्भासह प्रशासकिय व तांत्रिक मान्यता मिळणेकामी तसेच सदर प्रकल्पासाठी मा. राज्य शासना मार्फत किमान ७०% निधी उपलब्ध करून देणेबाबत खालीलप्रमाणे नमुद प्रस्तावास मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सर्व बाबींचा विचार करुन सदर PPP-HAM तत्वावर प्रकल्प राबविणेकरीता मा. शासनाकडुन खालील नमुद केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

१) प्रकल्पाची PPP-HAM मॉडेलअंतर्गत अंमलबजावणीस मान्यता.
२) PPP-HAM मॉडेलनुसार राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेस मान्यता.
३) प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यासाठी निर्देश.
४) GST खाते संलग्न Escrow खाते निर्मितीसाठी "Comfort Letter" देणे.

५) प्रकल्पाच्या भांडवली खर्चापैकी किमान ७०% निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्याची हमी; उर्वरित खर्च नाशिक महानगरपालिकेकडून वहन केला जाईल.

६) पात्र कंत्राटदारास निविदेत नमुद बाबींची पुर्तता व वरील प्रमाणे मान्यता मिळाले पश्चा:त LOA (Letter of Award) व Work Order निर्गमित करण्यास मान्यता.

**तांत्रिक मंजुरी :-**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.अमृत-२०२५/प्र.क्र.१७९/नवि-३३ नगरविकास विभाग दि. २९/०५/२०२५ संदर्भ क्र. २० चे पत्रानुसार "नाशिक येथे सन २०२७-२८ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित करण्यात येणार असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर देश -विदेशातील भाविक येणार असल्याने गोदावरी नदीमध्ये होणारे प्रदूषण रोखण्यासाठी शहरात निर्माण होणाऱ्या मलजल व सांडपाण्यावर प्रक्रिया होणे आवश्यक असून त्यासाठी मलनिःस्सारण प्रकल्प राबविणे आवश्यक आहे.

नाशिक शहरातील प्रस्तावित सिंहस्थ कुंभमेळयाचे प्राथम्य विचारात घेता नाशिक शहरातील मलनिःस्सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी अस्तिवातील STP प्रकल्पांमध्ये सुधारणासाठी व नवीन STP प्रकल्प उभारण्यासाठी PPP-HAM Model तत्त्वावरील प्रकल्प प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नाशिक महानगरपालिकेकडून करून घेऊन व याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्याशी समन्वय करून सदर प्रकल्प प्रस्तावास विहित कार्यपद्धतीनुसार तांत्रिक मान्यता देण्याच्या अनुषंगाने प्राथम्याने कार्यवाही करावी तसेच, आयुक्त नाशिक महानगरपालिका यांनी याबाबतचा आवश्यक पाठपुरावा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे करावा", असे नमुद केलेले आहे.

त्यानुसार सदर कामास तांत्रिक मंजुरी घेणेबाबत मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे आवश्यक कागदपत्र सादर करणेसाठी मा. आयुक्त तथा प्रशासक महोदया सो यांचे मंजुरीने आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आली. तांत्रिक मंजुरीबाबत मजीप्रा विभागाने प्रकल्पा विषयी उपस्थित केलेल्या मुद्दांचा खुलासा संदर्भ क्र. २३ पत्र क्र. जा.क्र.मनपा/साआअवि (मलनि:)/३२४/२०२५ दि. १०/०६/२०२५ अन्वये मा. मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक प्रादेशिक विभाग, यांचेकडे सादर केला आहे.

मा. मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांचे कडील संदर्भ क्र. २५ चे पत्र जा.क्र. मुअ/नाशिक/ चिशा/ १९१९/२०२५ दि.११/०६/२०२५ रोजीचे तांत्रिक मान्यता आदेशानुसार त्यामध्ये विहीत करण्यात आलेल्या अटी शर्तीना आधिन राहून र.रु.१४४४.१३ कोटी इतक्या रकमेस तांत्रिक मंजुरी देण्यात आलेली आहे. मजीप्राने तांत्रिक मान्यता देतांना प्रकल्प उभारणी कालावधीतील व्याजाची व संभाव्य भाववाढ रक्कम गृहीत धरलेली नाही. (IDC- Interest During Construction and Cost of Escalation During Construction)

मा.मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालयाचे संदर्भ क्र. २२ पत्र जा.क्र.मुअ/नाशिक/ उपअभियंता-०२/१८७५/२०२५ दि.०९/०६/२०२५ चे पत्रानुसार सदर प्रकल्पाला तांत्रिक मंजुरी देणेसाठी तपासणी शुल्क प्रकल्प रक्कमेच्या १% प्रमाणे भरणेबाबत कळविलेले आहे.

सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करतांना तांत्रिक शुल्क अदा करणेची बाब समाविष्ठ करण्यात आलेली नाही. तथापी सदर कामाचे तांत्रिक मंजुरी मिळालेल्या आदेशात नमुद केल्यानुसार अट क्र. ४९ नुसार मजीप्राचे तांत्रिक तपासणी शुल्क र.रु. १२.१३ कोटी (जी.एस.टी. वगळुन प्रकल्प किंमतीचे मुल्यावर) प्राधान्याने भरणे क्रमप्राप्त आहे. सद्य:स्थितीत मलनि:स्सारण विभागामार्फत सदर तांत्रिक शुल्काची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास मा. शासनाचे निर्देशानुसार अदा केली जाईल असे मा.मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक प्रादेशिक विभाग, नाशिक यांना कळविलेले आहे.

विषयाधीन काम सिंहस्थ कुंभमेळयाशी निगडीत असल्यामुळे कामाची तांत्रिक तपासणीसाठी लागणारे शुल्क माफ करणेबाबत सुट मिळणेकामीचा विनंती प्रस्ताव मा. शासनास सादर करण्यात येईल. मा. शासनाकडुन सदरचे शुल्क महानगरपालिकेमार्फत अदा करणेबाबत निर्देश प्राप्त झाल्यास र.रु. १२.१३ कोटी मजीप्रा विभागास अदा करणेसाठी नाशिक महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात त्यानुसार तरतुद करावी लागणार आहे. तरी सदर तांत्रिक शुल्क भरणेबाबतची तरतुद करणेसाठी सन २०२५-२०२६ च्या सुधारित अंदाजपत्रकात "PPP-HAM Model अंर्तगत मलनि:स्सारण केंद्र बांधणे§मनपा हिस्सा" या नावाने नवीन लेखाशिर्ष तयार करुन आवश्यक आर्थिक तरतुद करावी लागणार आहे.

महानगरपालिका सचिवालय

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महानगरपालिका महासभा ठराव

सभा क्र. : ०३

विषय क्र. : ११८ ठराव क्र. : ११८ दिनांक : १२ / ०६ / २०२५

**प्रशासकीय मंजुरी :-**

संदर्भ क्र. २१ मा. शासनाकडील शासन निर्णय क्र. नामपा-२०२५ प्र. क्र. १६१/ नवि-२५ दि.०९/०६/२०२५ च्या मा. शासन निर्णयानुसार सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टिने नियोजन करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रकल्पास सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. मा. शासनाकडुन प्राप्त प्रशासकीय मंजुरीचा आदेश खालीलप्रमाणे आहे.

**शासन निर्णय :-**

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये मलनि:स्सारणाच्या सुविधा उपलब्ध देण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP - HAM Model) तत्वावर मलनि:स्सारण प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही नाशिक महानगरपालिकेकडून सुरु आहे. सदर प्रकल्पास नाशिक महानगरपालिकेने दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आधारे नाशिक महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. सदर सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या स्विकृत निविदेची एकूण किंमत रुपये २६३२.९५ कोटी असून त्यामध्ये प्रकल्पाच्या २५ वर्षाच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामाच्या खर्चाचा देखील समावेश आहे. सदर प्रकल्पाच्या पुढील २५ वर्षाचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च वगळता सदर प्रकल्पाच्या स्विकृत निविदेची किंमत रुपये १४८२.९५ कोटी आहे. नाशिक महानगरपालिकेने दिलेल्या तांत्रिक मान्यतेमधील अटी व शर्तीच्या अधीन राहून सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर प्रकल्प राबविण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचा वित्तीय आकृतिबंध खालीलप्रमाणे-

| नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | प्रकल्प किंमत(र.रु. कोटी) | राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ७०%) (र.रु. कोटी) | कंत्राटदाराने उभारवायाची रक्कम (प्रकल्प किंमतीच्या ३०%) (र.रु. कोटी) |
|---|---|---|---|
| नाशिक महानगरपालिका | १४८२.९५ | १०३८.०७ | ४४४.८८ |
| प्रकल्प पुर्ण करण्याचा कालावधी कार्यादेश दिनांकापासून २४ महीने | | | |

२. नाशिक महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण प्रकल्पास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे: -

२.१. सदर प्रकल्पासाठी कार्यान्वयन यंत्रणा नाशिक महानगरपालिका राहील.

२.२. सदर प्रकल्पास विहित तांत्रिक मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी करावी.

२.३. सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP-HAM Model) तत्वाच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचना व त्या संबंधी वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन निर्णय, परिपत्रक व सूचना यानुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

२.४. सदर प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यतेमधील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे कार्यान्वयन यंत्रणेवर बंधनकारक राहील.

२.५. सदर प्रकल्पाच्या निविदा कागदपत्रांमध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया व अंमलबजावणी विहित कालावधीमध्ये पूर्ण करणे नाशिक महानगरपालिकेवर बंधनकारक राहील.

२.६. सदर प्रकल्पासाठी प्रकल्पाच्या प्रगतीनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार नाशिक कुंभमेळ्यासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून शासनाकडून निधी वितरीत केला जाईल.

२.७. सदर प्रकल्पासाठी वितरीत करण्यात येणारा निधी हा मलनि:स्सारण प्रकल्पांच्या अनुषंगाने विविध केंद्र व राज्य योजनांच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या कार्यात्मक साध्यांवर (Functional Outcome) आधारित असणार आहे. तसेच, सदर कार्यात्मक परिणामाची पूर्तता न झाल्यास सदर प्रकल्पास निधी वितरीत करण्यात येणार नाही. सदर बाबींची पूर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांची राहील.

२.८. सदर प्रकल्पासाठी शासनाच्या हिश्याचा प्रथम हप्त्याचा निधी कार्यादेश निर्गमित केल्यानंतर नाशिक महानगरपालिकेस वितरीत करण्यात येईल. त्यानुसार प्रचलित शासन योजनेतील निकषानुसार मलनि:स्सारण प्रकल्पांच्या अनुषंगाने नमूद कार्यात्मक साध्यांची पूर्तता केल्यानंतर पुढील हप्त्याचा निधी वितरीत करण्यात येईल.

२.९. सदर प्रकल्पासाठी उपलब्ध झालेल्या निधीमधून संबंधित कंत्राटदारास स्विकृत निविदा रकमेच्या १० टक्के मोबिलायझेशन ॲडव्हान्स (Mobilisation Advarice) देण्याबाबतची कार्यवाही अनुज्ञता तपासून नाशिक महानगरपालिकेने करावी.

२.१०. अभियानाच्या वित्तिय आकृतीबंधानुसार राज्य शासनाने वितरीत केलेल्या निधीच्या प्रमाणात सदर प्रकल्पाच्या इतर भागधारकांनी त्यांच्या हिश्याचा निधी उभा करून सदर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे नाशिक महानगरपालिकेवर बंधनकारक असणार आहे.

२.११. सदर प्रकल्पासाठी निधी वितरीत करताना दिलेल्या सूचनांनुसार, सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाने वितरीत निधीच्या प्रमाणात कंत्राटदाराने निधी उभारणे अनिवार्य राहील. सदर प्रकल्पासाठी वितरीत केलेला निधी त्याच प्रकल्पासाठी वापरणे बंधनकारक असून त्याचा वापर इतर प्रयोजनार्थ केल्यास सदर बाब ही गंभीर वित्तिय अनियमितता समजण्यात येईल.

२.१२. राज्य शासनामार्फत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी प्रकल्प मंजूर झाल्यानंतर, मूळ प्रकल्प किंमतीमध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र.ग्रापाघो-२०२१/प्र.क्र.१२२/पापु-०६, दिनांक २९ जून, २०२२ मध्ये नमुद कारणा व्यतिरिक्त वाढ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयन यंत्रणा व संबंधित कंत्राटदार यांची राहील. राज्य शासनामार्फत त्या करिता कोणतेही वाढीव अनुदान उपलब्ध केले जाणार नाही.

२.१३. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण करण्याची सर्वस्वीजबाबदारी ही नाशिक महानगरपालिकेची राहील.

२.१४. प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराने कामाची गुणवत्ता व देयके प्रमाणित केल्यानंतर उपलब्ध निधीच्या मर्यादेत कामाची देयके १५ दिवसांत संबंधित कंत्राटदारास देण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयन यंत्रणेची राहील.

२.१५. सदर प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार विहित निकषांनुसार नेमल्याबाबत नाशिक महानगरपालिकेने नियमोचित कार्यवाही करणे आवश्यक राहील.

२.१६. सदर प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या घेऊन व प्रकल्पातील उपांगाच्या जागा महानगरपालिकेच्या नावावर व ताब्यात असल्याची खातरजमा करून व प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक इतर तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्याची खातरजमा आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी करावी.

२.१७. नाशिक महानगरपालिकेस यापूर्वी युआयडीएसएसएमटी / अमृत अथवा इतर कोणत्याही योजनेंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या प्रकल्पातील उपांगे व या प्रकल्पातील उपांगे यामध्ये व्दिरुक्ती (Duplication) होत नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयुक्त, नाशिक महानगरपालिका व सदर प्रकल्पाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची राहील.

३. मोठ्या मलनि:स्सारण प्रकल्पाबाबतच्या प्रचलित शासन योजनेतील निकष/मार्गदर्शक सुचना सदर मलनि:स्सारण प्रकल्पास लागू राहतील.

उपरोक्त सर्व अटीशर्तीची पुर्तता व पालन करणे नाशिक महानगरपालिकेस बंधनकारक आहे.

Revised Financial Model

नाशिक महानगरपालिकेने विषयाधिन कामाकरीता निविदा सुचना क्र. ०३/२०२४-२५ दि. ०५/०४/२०२५ अन्वये ई-निविदा मागवली होती. ज्यामध्ये प्रकल्प खर्चाच्या संदर्भात गुंतवणुकीचे प्रमाण मा. महाराष्ट्र शासनाकडून ६०% आणि कंत्राटदाराकडून ४०% असे नमूद केले होते. त्यानुसार, १९/०४/२०२५ रोजी संभाव्य बोलीदाराने तांत्रिक व आर्थिक बोली सादर केली होती.

मनपाने विषयाधिन प्रकल्पासाठी मा. महाराष्ट्र शासनाकडे दि. ९ मे २०२५ रोजी सविस्तर प्रस्ताव सादर केला होता. दि. ९ जून २०२५ रोजीच्या मा. शासन निर्णयाद्वारे कंत्राटदाराने सादर केलेल्या आर्थिक बोलीनुसार प्रकल्प खर्चाच्या ७०% (र.रु १४८२.९५ कोटी) म्हणजेच र.रु. १०३८.०७ कोटी अनुज्ञेय अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

या संदर्भात, सल्लागार M/s. Blue Stream infrastructure Development Consultant Pvt. Ltd. यांना उपरोक्त मान्यतेनुसार सुधारित आर्थिक मॉडेल सादर करण्याची आणि सुधारित अनुदानानुसार Draft Connession

**महानगरपालिका सचिवालय**

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महानगरपालिका महासभा ठराव

सभा क्र. : ०३

विषय क्र. : ११८ ठराव क्र. : ११८ दिनांक : १२/०६/२०२५

Agreement मधील तद्अनुषंगीक कलमांमध्ये संबंधित सुधारणा प्रस्तावित करणेबाबत संदर्भ क्र.२४ पत्र क्र.जा.क्र./मनपा/साआअवि(मलनिः) ३२२/२०२५दि. १०/०६/२०२५ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार सल्लागार M/s. Blue Stream Infrastructure Development Consultant Pvt. Ltd. यांनी त्यांचे दि. १०/०६/२०२५ रोजीच्या पत्रानुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

Revised Financial Model – Nashik Project on Hybrid Annuity Model (HAM)

| Project Cost | | Rs. Cr |
|---|---|---|
| EPC Cost | | १४३२.०० |
| Int During Construction (IDC) | | ४६.५० |
| Revised Project Cost | | १४७८.५० |
| Escalation during Construction | | ११३.३० |
| Revised Gross Project Cost | | १५९१.८० |

| Payment to Concessionaire | | |
|---|---|---|
| Construction Support (To be paid during Const.) | १०३८ | Rs Cr |
| Balance Completion Cost (To be paid during O & M) | ५५३ | Rs Cr |
| No of Capital Annuity (equal) | २५ | |
| Capital Annuity per year | २२.१३ | Rs Cr |
| Interest on Balance Completion Cost (SBI MCLR + ३%) | १२% | |
| O & M Annuity (as quoted) | ४६.६१ | Rs Cr |
| Means of Finance | | Rs. Cr |
| Grant/Construction Support (W.R.T. Rs. १५९१ Cr.) | | १०३८.०७ |
| Debt | | ३८७ |
| Equity | | १६६ |
| Total | | १५९१ |

| Price Bid (If Quoted) | Rs. Cr |
|---|---|
| Bid Project Cost (To be paid along with Escalation) | १४७८.५० |
| O&M Annuity (To be paid along with Escalation) | ४६.६१ |
| Power Cost (To be paid at actual) | ६२.४१ |

| Project Timelines | |
|---|---|
| Concession Period (yrs) | २७ |
| Construction Period (yrs) | २ |
| Operation Period (yrs) | २५ |
| No of Working Days | ३६५ |

| | |
|---|---|
| Interest on Debt (p.a) SBI MCLR+३% | १२% |

| | |
|---|---|
| O&M Cost per year (Rs Cr) | ४६.६१ |
| Escalation on O&M cost per year | ५.००% |

| Year | १ | २ | | Total |
|---|---|---|---|---|
| Capital expenditure | ५०% | ५०% | | १००% |
| EPC | ७१५.७५ | ७१५.७५ | | १४३१.५० |
| IDC | ११.६२ | ३४.८५ | | ४६.४७ |
| Bid Project Cost | ७२७.३७ | ७५०.६० | | १४७७.९७ |
| Escalation during Construction | ३६.३७ | ७६.९४ | | ११३.३१ |
| Adjusted Bid Project Cost | ७६३.७४ | ८२७.५४ | | १५९१.२७ |
| Construction Support | ४९८.२२ | ५३९.८५ | | १०३८.०७ |

महानगरपालिका सचिवालय

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महानगरपालिका महासभा ठराव

सभा क्र. : ०३

विषय क्र. : ११८ ठराव क्र. : ११८ दिनांक : १२/०६/२०२५

### Capital Annuity Schedule

| Year | Opening Balance | Capital Annuity | Closing Balance | Interest on Balance Completion Cost | Total Capex Annuity incl interest |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | 553.20 | 22.13 | 531.08 | 65.06 | 87.18 |
| 4 | 531.08 | 22.13 | 508.95 | 62.40 | 84.53 |
| 5 | 508.95 | 22.13 | 486.82 | 59.75 | 81.87 |
| 6 | 486.82 | 22.13 | 464.69 | 57.09 | 79.22 |
| 7 | 464.69 | 22.13 | 442.56 | 54.44 | 76.56 |
| 8 | 442.56 | 22.13 | 420.44 | 51.78 | 73.91 |
| 9 | 420.44 | 22.13 | 398.31 | 49.12 | 71.25 |
| 10 | 398.31 | 22.13 | 376.18 | 46.47 | 68.60 |
| 11 | 376.18 | 22.13 | 354.05 | 43.81 | 65.94 |
| 12 | 354.05 | 22.13 | 331.92 | 41.16 | 63.29 |
| 13 | 331.92 | 22.13 | 309.79 | 38.50 | 60.63 |
| 14 | 309.79 | 22.13 | 287.67 | 35.85 | 57.98 |
| 15 | 287.67 | 22.13 | 265.54 | 33.19 | 55.32 |
| 16 | 265.54 | 22.13 | 243.41 | 30.54 | 52.67 |
| 17 | 243.41 | 22.13 | 221.28 | 27.88 | 50.01 |
| 18 | 221.28 | 22.13 | 199.15 | 25.23 | 47.35 |
| 19 | 199.15 | 22.13 | 177.03 | 22.57 | 44.70 |
| 20 | 177.03 | 22.13 | 154.90 | 19.92 | 42.04 |
| 21 | 154.90 | 22.13 | 132.77 | 17.26 | 39.39 |
| 22 | 132.77 | 22.13 | 110.64 | 14.60 | 36.73 |
| 23 | 110.64 | 22.13 | 88.51 | 11.95 | 34.08 |
| 24 | 88.51 | 22.13 | 66.38 | 9.29 | 31.42 |
| 25 | 66.38 | 22.13 | 44.26 | 6.64 | 28.77 |
| 26 | 44.26 | 22.13 | 22.13 | 3.98 | 26.11 |
| 27 | 22.13 | 22.13 | 0.00 | 1.33 | 23.46 |

महानगरपालिका सचिवालय

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महानगरपालिका महासभा ठराव

सभा क्र. : ०३

विषय क्र. : ११८ ठराव क्र. : ११८ दिनांक : १२ / ०६ / २०२५

Cash Flow

| Year | Cash Inflows: Capital Annuity | Interest on Capital Annuity | O&M Annuity | Revenue (A) | Cash Outflows: Capital Expenditure (Exc. IDC & Grant) | O&M Expenses | Tax | (B) | Net Cashflows (A-B) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | 253.89 | | 0.00 | **253.89** | **-253.89** |
| 2 | | | | | 252.84 | | 0.00 | **252.8 4** | **-252.84** |
| 3 | 22.13 | 65.06 | 51.39 | **138.57** | | 51.39 | 5.07 | **56.46** | **82.12** |
| 4 | 22.13 | 62.40 | 53.96 | **138.49** | | 53.96 | 5.18 | **59.14** | **79.35** |
| 5 | 22.13 | 59.75 | 56.65 | **138.53** | | 56.65 | 5.29 | **61.95** | **76.58** |
| 6 | 22.13 | 57.09 | 59.49 | **138.71** | | 59.49 | 5.40 | **64.89** | **73.82** |
| 7 | 22.13 | 54.44 | 62.46 | **139.03** | | 62.46 | 5.51 | **67.98** | **71.05** |
| 8 | 22.13 | 51.78 | 65.58 | **139.49** | | 65.58 | 5.63 | **71.21** | **68.28** |
| 9 | 22.13 | 49.12 | 68.86 | **140.12** | | 68.86 | 5.74 | **74.60** | **65.52** |
| 10 | 22.13 | 46.47 | 72.31 | **140.90** | | 72.31 | 5.85 | **78.16** | **62.75** |
| 11 | 22.13 | 43.81 | 75.92 | **141.86** | | 75.92 | 5.96 | **81.88** | **59.98** |
| 12 | 22.13 | 41.16 | 79.72 | **143.01** | | 79.72 | 6.07 | **85.79** | **57.22** |
| 13 | 22.13 | 38.50 | 83.70 | **144.34** | | 83.70 | 6.18 | **89.89** | **54.45** |
| 14 | 22.13 | 35.85 | 87.89 | **145.87** | | 87.89 | 6.29 | **94.18** | **51.68** |
| 15 | 22.13 | 33.19 | 92.28 | **147.61** | | 92.28 | 6.41 | **98.69** | **48.92** |
| 16 | 22.13 | 30.54 | 96.90 | **149.56** | | 96.90 | 6.52 | **103.42** | **46.15** |
| 17 | 22.13 | 27.88 | 101.74 | **151.75** | | 101.74 | 6.63 | **108.37** | **43.38** |
| 18 | 22.13 | 25.23 | 106.83 | **154.19** | | 106.83 | 6.35 | **113.18** | **41.00** |
| 19 | 22.13 | 22.57 | 112.17 | **156.87** | | 112.17 | 5.68 | **117.85** | **39.02** |
| 20 | 22.13 | 19.92 | 117.78 | **159.82** | | 117.78 | 5.01 | **122.79** | **37.03** |
| 21 | 22.13 | 17.26 | 123.67 | **163.06** | | 123.67 | 4.34 | **128.01** | **35.04** |
| 22 | 22.13 | 14.60 | 129.85 | **166.59** | | 129.85 | 3.68 | **133.53** | **33.06** |
| 23 | 22.13 | 11.95 | 136.35 | **170.42** | | 136.35 | 3.01 | **139.35** | **31.07** |
| 24 | 22.13 | 9.29 | 143.16 | **174.59** | | 143.16 | 2.34 | **145.50** | **29.08** |
| 25 | 22.13 | 6.64 | 150.32 | **179.09** | | 150.32 | 1.67 | **151.99** | **27.10** |
| 26 | 22.13 | 3.98 | 157.84 | **183.95** | | 157.84 | 1.00 | **158.84** | **25.11** |
| 27 | 22.13 | 1.33 | 165.73 | **189.19** | | 165.73 | 0.33 | **166.06** | **23.12** |

महानगरपालिका सचिवालय

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महानगरपालिका महासभा ठराव

सभा क्र. :०३

विषय क्र. : ११८ ठराव क्र. : ११८ दिनांक : १२ /०६ /२०२५

Debt Schedule

| Year | Opening | Addition | Repayment | Closing | | Interest | IDC | Interest paid |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 0.00 | 193.62 | 0.00 | 193.62 | | 11.62 | 11.62 | 0.00 |
| 2 | 193.62 | 193.62 | 0.00 | 387.24 | | 34.85 | 34.85 | 0.00 |
| 3 | 387.24 | | 25.82 | 361.43 | | 44.92 | | 44.92 |
| 4 | 361.43 | | 25.82 | 335.61 | | 41.82 | | 41.82 |
| 5 | 335.61 | | 25.82 | 309.79 | | 38.72 | | 38.72 |
| 6 | 309.79 | | 25.82 | 283.98 | | 35.63 | | 35.63 |
| 7 | 283.98 | | 25.82 | 258.16 | | 32.53 | | 32.53 |
| 8 | 258.16 | | 25.82 | 232.35 | | 29.43 | | 29.43 |
| 9 | 232.35 | | 25.82 | 206.53 | | 26.33 | | 26.33 |
| 10 | 206.53 | | 25.82 | 180.71 | | 23.23 | | 23.23 |
| 11 | 180.71 | | 25.82 | 154.90 | | 20.14 | | 20.14 |
| 12 | 154.90 | | 25.82 | 129.08 | | 17.04 | | 17.04 |
| 13 | 129.08 | | 25.82 | 103.26 | | 13.94 | | 13.94 |
| 14 | 103.26 | | 25.82 | 77.45 | | 10.84 | | 10.84 |
| 15 | 77.45 | | 25.82 | 51.63 | | 7.74 | | 7.74 |
| 16 | 51.63 | | 25.82 | 25.82 | | 4.65 | | 4.65 |
| 17 | 25.82 | | 25.82 | 0.00 | | 1.55 | | 1.55 |
| 18 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |
| 19 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |
| 20 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |
| 21 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |
| 22 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |
| 23 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |
| 24 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |
| 25 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |
| 26 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |
| 27 | 0.00 | | | 0.00 | | 0.00 | | 0.00 |

महानगरपालिका सचिवालय

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## महानगरपालिका महासभा ठराव

सभा क्र. : ०३

विषय क्र. : ११८ ठराव क्र. : ११८ दिनांक : १२/०६/२०२५

**Tax Calculations**

**Tax Rate** 25.17%

| Year | EBIDTA (Revenue-op expen) | Depreciation | Interest | PBT | Loss carried forward for the year | Loss adjusted for the year | Loss carried forward (cumulative) | Taxable income after carried forward losses | Tax |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 0.00 | | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | **0.00** |
| 2 | 0.00 | | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | **0.00** |
| 3 | 87.18 | 22.13 | 44.92 | 20.14 | 0.00 | 0.00 | 0.00 | 20.14 | **5.07** |
| 4 | 84.53 | 22.13 | 41.82 | 20.58 | 0.00 | 0.00 | 0.00 | 20.58 | **5.18** |
| 5 | 81.87 | 22.13 | 38.72 | 21.02 | 0.00 | 0.00 | 0.00 | 21.02 | **5.29** |
| 6 | 79.22 | 22.13 | 35.63 | 21.46 | 0.00 | 0.00 | 0.00 | 21.46 | **5.40** |
| 7 | 76.56 | 22.13 | 32.53 | 21.91 | 0.00 | 0.00 | 0.00 | 21.91 | **5.51** |
| 8 | 73.91 | 22.13 | 29.43 | 22.35 | 0.00 | 0.00 | 0.00 | 22.35 | **5.63** |
| 9 | 71.25 | 22.13 | 26.33 | 22.79 | 0.00 | 0.00 | 0.00 | 22.79 | **5.74** |
| 10 | 68.60 | 22.13 | 23.23 | 23.23 | 0.00 | 0.00 | 0.00 | 23.23 | **5.85** |
| 11 | 65.94 | 22.13 | 20.14 | 23.68 | 0.00 | 0.00 | 0.00 | 23.68 | **5.96** |
| 12 | 63.29 | 22.13 | 17.04 | 24.12 | 0.00 | 0.00 | 0.00 | 24.12 | **6.07** |
| 13 | 60.63 | 22.13 | 13.94 | 24.56 | 0.00 | 0.00 | 0.00 | 24.56 | **6.18** |
